# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२३

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ / फाल्गुन ८, १९४४ (शके)**

**(१) उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री**
**(२) अन्न व औषध प्रशासन मंत्री**
**(३) उद्योग मंत्री**
**(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री**
**(५) शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २३**

---

### राज्यातील पात्र शिधापत्रिकाधारकांना 'दिवाळी शिधा' व नियमित धान्य वेळेत वितरित करण्याबाबत

**(१) * १६९६४ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिकेत तटकरे, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.रामदास आंबटकर, श्री.रामराव पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १६११६ ला दिनांक २३ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने दिवाळी सणानिमित्त पात्र शिधापत्रिकाधारकांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेतंर्गत "आनंदाचा शिधा" वाटप करण्याची घोषणा केली असतानाही आजमितीस राज्यातील २० टक्के लाभार्थींना 'दिवाळी शिधा' मिळाला नसल्याची बाब दिनांक ४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही शिधापत्रिकाधारकांना माहे सप्टेंबरचे धान्य डिसेंबरमध्ये मिळाले असून, बायोमॅट्रीक मशीनमध्ये तांत्रिक बिघाड असल्यामुळे ज्या शिधापत्रिकाधारकांच्या अंगठ्याची मशीनमध्ये नोंद झाली असेल त्यांनाच दिवाळी किट मिळत असल्याचे, काही शिधापत्रिकाधारकांना एक किंवा दोनच वस्तू मिळत असल्याने गरीब लोकांना धान्य मिळाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भंडारा जिल्ह्यातील शिधापत्रिकाधारकांना दिवाळीच्या सणानिमित्त जाहीर करण्यात आलेला "आनंदाचा शिधा" किट माहे डिसेंबर, २०२२ व जानेवारी, २०२३ मध्ये वितरीत करण्यात आल्याचे तसेच गरीब आणि गरजू लोकांना माहे सप्टेंबर, २०२२ मधील धान्य माहे डिसेंबर, २०२२ मध्ये

मिळाले असून माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २०२२ चे नियमित रेशनिंगचे धान्य अद्याप वितरीत झाले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अंत्योदय व दुसऱ्या गटातील हजारो लाभधारकांना रेशनिंगचे धान्य वेळेवर मिळत नसल्याने त्यांची उपासमार होत आहे हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सर्व शिधापत्रिकाधारकांना नियमित धान्य तातडीने वाटप करण्यासाठी तसेच आनंदाचा शिधा मिळण्यापासून वंचित राहिलेल्या पात्र शिधापत्रिकाधारकांना सदर शिधा वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) व (२) हे खरे नाही. पात्र शिधापत्रिकाधारकांना शिधाजिन्नस संचांचे वितरण ई-पॉस प्रणालीद्वारे ऑनलाईन पध्दतीने करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. तथापि, राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत (NFSA) नियमित तसेच कोविड-१९ प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेंतर्गत (PMGKAY) मोफत अन्नधान्य वितरणाच्या ताणाने ई-पॉस प्रणालीवर उद्भवलेल्या तांत्रिक समस्यांमुळे ऑनलाईन पध्दतीने वितरण करताना अडचणींबाबत प्राप्त तक्रारी तसेच लाभार्थ्यांना विहीत कालावधीत शिधाजिन्नस उपलब्ध होण्याच्या दृष्टीने मा.मुख्यमंत्री यांनी दिलेल्या निर्देशांनुसार शिधाजिन्नस संचांचे वितरण ऑफलाईन पध्दतीने करण्याबाबत सर्व संबंधितांना कळविण्यात आले. तसेच शिधाजिन्नस उपलब्ध करुन देणे प्राधान्याची बाब असल्याने जे शिधाजिन्नस ज्या जिल्ह्यात उपलब्ध होतील त्याप्रमाणे शिधाजिन्नस वितरीत करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

दिवाळी शिधाजिन्नस संच वितरणाच्या अनुषंगाने क्षेत्रिय कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या अहवालांनुसार सुमारे ९८ टक्के शिधाजिन्नस संचांचे पात्र शिधापत्रिकाधारकांना वितरण करण्यात आले आहे.
(३) व (४) हे खरे नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर विद्यापीठातून पेट परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यांना पीएच.डी. गाईड मिळत नसल्याबाबत

**(२) * १७७९१ श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर विद्यापीठातून पेट परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यांना पीएच.डी. गाईड मिळत नसल्याने विद्यापीठाने गाईड उपलब्ध करून द्यावा या मागणीसाठी हिवाळी अधिवेशनात मोर्चा काढण्यात आल्याची बाब माहे डिसेंबर, २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागपूर विद्यापीठात पीएच.डी. विद्यार्थ्यांना गाईड उपलब्ध करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना तसेच कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) पीएच.डी. संशोधकांच्या मार्गदर्शकास विद्यापीठाने निर्गमित केलेल्या निर्देशानुसार कमीत कमी ५ वर्ष पद्व्युत्तर शिक्षक/ १० वर्ष पदवी शिक्षक म्हणून विद्यापीठाची मान्यता असणे आवश्यक असते. ही अट पूर्ण होत नसल्यामुळे तसेच विषयांमध्ये नियमित प्राध्यापक उपलब्ध नसल्याने काही विषयांसाठी मार्गदर्शक उपलब्ध होऊ शकत नाहीत. तथापि, ज्या संशोधकास मार्गदर्शक उपलब्ध होऊ शकत नाही अशा संशोधकांनी Interdisciplinary Research मधील मार्गदर्शक घेऊन आचार्य पदवी करीता त्यांच्या पात्रतेनुसार नामांकन करण्याची तरतूद विद्यापीठाच्या निर्देश क्र.१९/२०२२ परि. क्र.६ मध्ये करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शासनाने केलेल्या सर्वेक्षणात स्थलांतरीत मजूर / कामगारांच्या मुलांनी वसतिगृहाअभावी शाळा सोडल्याचे आढळून आल्याबाबत

**(३) * १७४६२ श्री.सुरेश धस, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अंबादास दानवे, श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने केलेल्या सर्वेक्षणात स्थलांतरीत मजुर किंवा कामगारांच्या ७२३ मुलांनी शाळा सोडल्याचे तसेच बीड जिल्ह्यातील ऊसतोड मजुरांची ० ते १८ वयोगटातील १ हजार ९०५ मुले कोल्हापूर जिल्ह्यात स्थलांतरित झाल्याची माहिती अवनी संस्थेच्या सर्वेक्षणातून माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लोकनेते गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाची संत भगवानबाबा वसतिगृह योजना न राबविल्यामुळे वसतिगृहाअभावी १७,२९७ मुलांनी शाळा सोडली असून त्यात मजूरांच्या ७,८०६ मुलांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वसतिगृह तयार करून या शाळाबाहय मुलांचे प्रमाण कमी करण्यासाठी व मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

स्थलांतरित कुटूंबातील बालकांना नियमित शाळेत दाखल करून त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली आहे. स्थलांतरित बालकांना शाळेच्या प्रक्रियेत आणणेबाबतच्या सूचना संबंधित गट शिक्षणाधिकारी, प्रशासन अधिकारी यांना देवून कार्यवाही करण्यात आली आहे. पालकांचे समुपदेशन व हंगामी वसतिगृह योजना यामाध्यमातून मुलांना शाळेच्या प्रवाहात आणण्यात आले आहे. तसेच स्थलांतरित मुलांना शिक्षण हमी कार्ड देण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मराठवाड्यातील जिल्हानिहाय ब्लॅक स्पॉट घोषित करून अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(४) * १७२०४ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी : तारांकित प्रश्न क्रमांक १५७७६ ला दिनांक २३ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रस्त्यावर वारंवार होत असलेले अपघात रोखण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदयांनी ब्लॅक स्पॉट घोषित करून उपाययोजना करण्याबाबतचे आदेश माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाड्यातील अशा अपघातप्रवण ठिकाणी दुभाजक, सर्व्हीस रोड दिशादर्शक फलक, वेगमर्यादा नियंत्रक फलक अशा कोणत्याही उपाययोजना प्रत्यक्षरित्या राबविण्यात येत नसल्याने अपघाताचे व मृत्यूचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने मराठवाड्यातील जिल्हानिहाय ब्लॅक स्पॉट यांची थोडक्यात सविस्तर माहिती काय आहे, तसेच अपघात रोखण्यासाठी कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

(३) मराठवाड्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग व भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) यांच्या अखत्यारितील रस्त्यांवर एकूण १०१ ब्लॅकस्पॉट आहेत. जिल्हानिहाय ब्लॅकस्पॉटचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे :-

| जिल्हा | ब्लॅकस्पॉटची संख्या |
|---|---|
| औरंगाबाद | ४२ |
| नांदेड | ४० |
| परभणी | ०१ |
| हिंगोली | १२ |
| लातूर | ०१ |
| जालना | ०५ |
| **एकूण** | **१०१** |

यापैकी ६६ ब्लॅकस्पॉटचे काम पूर्ण झालेले आहे. उर्वरित ब्लॅकस्पॉटची कामे प्राथम्याने पूर्ण करण्याचे नियोजन आहे. ब्लॅकस्पॉटच्या ठिकाणी दोन्ही बाजूस रंबलर स्ट्रिप, वेगनियंत्रक फलक, कॅट आईज, डेलिनेटर व दिशादर्शक/अपघातप्रवण माहिती फलक इ. रस्तेसुरक्षा विषयक उपाययोजना प्राथम्याने केलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## माध्यमिक विभागाचे लेखाधिकारी व भविष्य निर्वाह निधीचे कार्यालय पालघर जिल्ह्यात सुरु करण्याबाबत

**(५) * १७५४१ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माध्यमिक विभागाचे लेखाधिकारी कार्यालय व वेतन पथक, भविष्य निर्वाह निधीचे कार्यालय पालघर जिल्ह्यात सुरू न झाल्याने जिल्ह्यातील शिक्षकांना ठाणे येथील कार्यालयात फेऱ्या माराव्या लागत असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पालघर जिल्ह्यात प्राथमिक आणि माध्यमिक विभागासाठी अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह पथक या कार्यालयातील अधीक्षक तसेच लेखाधिकारी, वेतन व पडताळणी पथक कार्यालयातील लेखाधिकारी यांची अधिक पदे मंजूर झाली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सप्टेंबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयाद्वारे सदर कार्यालये व अधिकारी आणि कर्मचारीवर्गाला शासनाने मान्यता दिली असून प्रत्यक्ष कार्यालये सुरू झालेली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तद्‌नुषंगाने सदर कार्यालये सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्याची एनपीएस बाबतच्या तांत्रिक अडचणीचे निराकरण करणेस्तव एन.पी.एस. बाबत डीडीओ, डीटीओ व डीटीए निर्धारित करणेस्तव शासनास प्रस्ताव प्राप्त झाला असून त्यावर कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## बारसू (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील परिसरात उभारावयाच्या तेलशुध्दीकरण प्रकल्पाबाबत

**(६) * १७२२० श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस : दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ९ मधील प्रश्न क्रमांक ९२७३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाणार (ता.राजापूर,जि.रत्नागिरी) परिसरात ४ वर्षांपूर्वी शासनामार्फत दोन लाख कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या गुंतवणूकीचा तेलशुध्दीकरण प्रकल्प (रिफायनरी प्रकल्प) उभारण्याचे प्रस्तावित करुन तेथे कार्यवाही सुरु केल्यानंतर या परिसरातील बहुतांश गावांतील शेतकऱ्यांनी प्रकल्पास तीव्र विरोध करुन आंदोलने केल्यामुळे सदर प्रकल्प रद्द करण्याचा सुमारे अडीच वर्षापूर्वी शासनाने निर्णय घेतला व तद्नंतर सदर प्रकल्प रायगड जिल्ह्यात उभारण्याचा शासनाने विचार केला असता तेथील गावकऱ्यांनीही प्रकल्पास विरोध दर्शविल्यामुळे तेथेही पुढील कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आता बारसू (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) या परिसरातील गावांमध्ये सदर तेलशुध्दीकरण प्रकल्प उभारण्याचे शासनाने प्रस्तावित केलेले असून या प्रकल्पामुळे या परिसरातील शेतकऱ्यांचे शेती व बागायती क्षेत्र बाधित होऊन शेतकरी उद्ध्वस्त होणार असून या प्रकल्पास या परिसरातील बहुतांश ग्रामस्थांनी तीव्र विरोध करुन आंदोलने केलेली आहेत व पंचक्रोशीत जेथे रिफायनरी होणार आहे त्या पाच ग्रामपंचायतीमधील ग्रामस्थांमध्ये सदर प्रकल्पाविरोधी ठराव मंजूर केलेले आहेत व बारसू परिसरातील बहुतांश ग्रामस्थांचा या प्रकल्पास विरोध कायम आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर परिस्थिती दुर्लक्षित करुन बारसू परिसरात गेल्या अनेक महिन्यांपासून जमावबंदी लागू करुन उक्त आंदोलनात सहभागी होणाऱ्या आंदोलकांपैकी काहींना तडीपारच्या नोटीसा काढलेल्या आहेत व या परिसरातील गावांमध्ये जबरदस्तीने भूगर्भाची तपासणी सुरु करण्यात आलेली असून या प्रकारांमुळे गावकऱ्यांचे दैनंदिन व्यवहार/कामकाज ठप्प होऊन त्यांच्यावर आर्थिक संकट ओढवले असल्यामुळे या गावांमध्ये सतत विरोध वाढत आहे व आंदोलने होण्यासारखी स्थिती आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर परिसरात मोठ्या प्रमाणात कातळ शिल्पे असल्याचे व सदर कातळ शिल्पे ऐतिहासिक वर्गातील (हेरिटेज वर्गात असलेल्या) वास्तू असल्याचे स्पष्ट झालेले असून त्याची पाहणीही करण्यात आलेली आहे व यासंदर्भातील पुढील कार्यवाहीसाठी याबाबतचा प्रस्ताव युनेस्कोकडे सादर करण्यात आलेला आहे व या ऐतिहासिक पुरातन वास्तुंचे जतन व संवर्धन करण्याकरीता प्राधान्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे व हेरिटेज वर्गात मोडणाऱ्या वास्तूंच्या ठिकाणी अन्य कोणतेही प्रकल्प राबविण्यावर बंधने आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर बाबी विचारात घेऊन बारसू परिसरात उभारावयाच्या प्रकल्पाचा फेरविचार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

अध्यक्ष, बारसू सोलगांव पंचक्रोशी रिफायनरी विरोधी संघटना, ता.राजापूर, जि.रत्नागिरी यांचे धोपेश्वर, गोवळ, सोलगांव, शिवणे (खु.), देवाचे गोठणे व आंबोळगड या गावात रिफायनरी प्रस्तावित न करणेबाबत उप विभागीय अधिकारी, राजापूर यांना निवेदन सादर केलेले आहे. तसेच वरील गावातील ग्रामपंचायतीने प्रकल्पाविरोधी ठराव मंजूर केलेले आहेत.

बारसू परिसरात जमावबंदी लागू करुन आंदोलनात सहभागी होणाऱ्या आंदोलनापैकी एकूण ६ व्यक्तींना तडीपारच्या नोटीसा काढलेल्या असून त्या नोटीस संदर्भात उपविभागीय दंडाधिकारी, राजापूर येथे सुनावणी सुरु आहे.

(४) अंशत: खरे आहे.

प्रस्तावित रिफायनरीसाठी भूसंपादन प्रक्रिया राबविताना पुरातत्व विभागाचे याबाबतचे धोरण विचारात घेऊन पुरातत्व विभागाशी संबंधित क्षेत्र वगळून भूसंपादनाची कार्यवाही करण्यात येईल.

(५) सदर प्रकल्पाकरीता बारसू, ता.राजापूर, जि.रत्नागिरी येथे क्षेत्र उपलब्ध असल्याबाबत केंद्र शासनास दिनांक २२/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या बनावट ना-हरकत प्रमाणपत्र असलेल्या शाळा आढळून येत असल्याबाबत

**(७) * १७७३२ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, श्री.सचिन अहिर, ॲड.अनिल परब, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.महादेव जानकर, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.जयंत पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रवीण दटके, श्री.रामदास आंबटकर, श्री.रामराव पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) सुमारे १ लाखांहून अधिक शाळा कार्यरत असून त्यातील जवळपास ६५० शाळांच्या मान्यता क्रमांकाची नोंद यु-डायसच्या माहितीमध्ये नसल्याची बाब दिनांक १० जानेवारी, २०२३ च्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या(सीबीएसई) शाळांच्या बनावट ना-हरकत प्रमाणपत्र प्रकरणी शिक्षण विभागाने पोलिसांकडे तक्रार केली असून यु-डायस प्रणालीत माहिती न जुळणाऱ्या राज्यातील ६६६ सीबीएसई शाळांची तपासणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंत्रालयातील उच्च पदस्थ अधिकाऱ्यांची नावे आणि बनावट स्वाक्षऱ्या यांचा वापर करून सीबीएसई शाळांना बनावट ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आल्याचे तसेच मान्यता नसताना पुणे येथे काही शाळा सुरू असून विभागामार्फत करण्यात आलेल्या प्राथमिक चौकशीमध्ये सीबीएसई मंडळाच्या ३ बोगस मान्यता प्रमाणपत्र असलेल्या शाळा आढळून आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात बनावट प्रमाणपत्र देणारी एक टोळी कार्यरत असून या प्रमाणपत्रांकरीता लाखो रुपयांचे व्यवहार झाल्याचे पुणे जिल्हा परिषदेचे अधिकाऱ्यांनी केलेल्या चौकशीत स्पष्ट झाले आहे हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित बनावट ना-हरकत प्रमाणपत्र घेऊन शाळा चालविणाऱ्या संस्थांवर कोणती कारवाई केली वा करण्यात आली आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे अंशत: खरे आहे. राज्यात राज्य मंडळाव्यतिरिक्त अन्य मंडळाच्या शाळांची संख्या १७२३ इतकी असून सीबीएसई शाळांची संख्या १२६१ इतकी आहे. राज्यात मदरशांसह अनधिकृत शाळांची संख्या ६२१ इतकी आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प., पुणे यांचेमार्फत पुणे येथील तीन बोगस प्रमाणपत्रांच्या प्रकरणी समर्थ पोलीस स्टेशन, पुणे येथे FIR दाखल करण्यात आला आहे. तसेच बोगस शाळांच्या बाबतीत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने शाळांच्या प्रमाणपत्रांची वैधता तपासण्यासाठी शिक्षण सह संचालक, प्रशासन अंदाज व नियोजन यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समिती कडून शाळांच्या प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात येत आहे. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय (जि.वर्धा) येथील वसतिगृहामध्ये विद्यार्थ्यांना जेवणामधून विषबाधा झाल्याबाबत

**(८) * १७२९५ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर विभागातील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय (जि.वर्धा) येथील वसतिगृहामध्ये जेवणामधून अनेक विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याचे माहे डिसेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची माहिती विद्यापीठ प्रशासनाने अन्न व औषधी प्रशासनाला दिली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अन्न व औषधी प्रशासनाने तेथील जेवणाचे नमुने घेऊन त्याचा अहवाल शासनाला सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) होय हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

केंद्रशासनाच्या अखत्यारीतील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय विश्वविद्यालय (जि.वर्धा) च्या कुलसचिवांकडून प्राप्त माहितीनुसार वसतिगृहामध्ये दूषित जेवणामुळे अनेक विद्यार्थ्यांना त्रास झाल्याने विद्यार्थ्यांनी विश्वविद्यालय प्रशासनाविरुध्द आंदोलन केले होते व त्यांची बातमी वृत्तपत्रामध्ये प्रकाशित झाली होती. विश्वविद्यालयाला कोणतीही माहिती न देता अन्न व औषधी प्रशासन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी स्वतः जेवणाचे नमूने घेऊन गेले होते. त्याबाबत कोणताही अहवाल विभागास प्राप्त नाही.
(४) महात्मा गांधी हिंदी विश्वविद्यालय यांनी सदर प्रकरणी वसतिगृहाच्या मेस चालकाविरुध्द रामनगर पोलीस स्टेशन वर्धा येथे दिनांक ०१/११/२०२२ रोजी FIR नोंदविला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सन २०२२ – २०२३ या शैक्षणिक वर्षातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया पूर्ण न झाल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याबाबत

**(९) * १७०३३ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०२२ – २०२३ या शैक्षणिक वर्षात सहा महिन्यांचा कालावधी उलटूनही अनेक व्यावसायिक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली नसल्याची बाब दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली नसल्याने उर्वरित सहा महिन्यांच्या कालावधीत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करुन व्यवसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण देणे व परीक्षा घेणे विहित वेळेत शक्य होणार नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी प्रवेश प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमाकरीता प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येतात. त्याकरीता तंत्र शिक्षण, उच्च शिक्षण, कृषी शिक्षण, कला शिक्षण व वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत त्यांच्याशी संबंधित अभ्यासक्रमांकरीता केंद्र शासनाच्या शिखर संस्थांच्या परीक्षांच्या वेळापत्रकासमवेत समन्वय साधून राज्यातील प्रवेश प्रक्रिया राबविली जाते.

राष्ट्रीय परीक्षा एजेंसी (National Test Agency) यांच्याव्दारे घेण्यात येणाऱ्या अभियांत्रिकी प्रवेशाच्या जेईई (मेन) परिक्षेच्या नियोजित वेळापत्रकात बदल झाल्याने तसेच वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अभ्यासक्रमाशी संबंधित राष्ट्रीय पात्रतासह प्रवेश परीक्षा (National Eligibility Cum Entrance Test) यांच्या प्रवेश प्रक्रीयेच्या नियोजित वेळापत्रकात बदल झाल्याने त्याचप्रमाणे फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया या राष्ट्रीय स्तरावरील शिखर परिषदेव्दारा औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या मान्यता देण्यास विलंब केल्याने राज्यातील प्रवेश प्रक्रियेस विलंब झालेला आहे.

वरील अभ्यासक्रमांव्यतिरिक्त कृषी शिक्षण अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिया ह्या नोव्हेंबर, २०२२ अखेर, कला शिक्षण पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिया ऑक्टोबर, २०२२ अखेर, तंत्र शिक्षण अंतर्गत अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र व संलग्न अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया ह्या नोव्हेंबर, २०२२ अखेर व उच्च शिक्षण अंतर्गत अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया ह्या डिसेंबर, २०२२ अखेर पूर्ण करण्यात आलेल्या आहेत.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील तांत्रिक व्यावसायिक पदविका अभ्यासक्रमांसाठी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांनी सर्व संस्थांच्या प्राचार्यांना शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी जादा तासिका वर्ग आयोजित करुन अभ्यासक्रम व सत्रकर्म पूर्ण करण्याबाबत सर्व संस्थांना सूचित केले आहे.

तसेच पदवी अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांनीही विद्यार्थ्यांचे शैक्षणिक कार्यभार पूर्ण व्हावा व शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी स्थानिक स्तरावर शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी जादा तासिका वर्ग, तसेच प्रात्यक्षिके आयोजित करण्याचे धोरण अवलंबलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात कर्नाटक सीमावर्ती भागातील पाच जिल्ह्यात मराठी शाळा सुरू करणेबाबत

**(१०)** * **१७६५४ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कर्नाटक सीमा भागातील पाच जिल्ह्यातील शैक्षणिक संस्थानी मराठी शाळा सुरू करणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर केलेला असून मंजूरी अभावी या भागातील विद्यार्थ्यांना कन्नड माध्यमाच्या शाळेत शिक्षण घ्यावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रस्ताव मंजुरीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) व (२) राज्यातील सीमावर्ती भागातील जिल्ह्यांमध्ये मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळा सुरू करण्यासाठी इच्छुक खाजगी संस्थेकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. तथापि, सदर प्रस्ताव मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेने शासन निर्णय, दिनांक ०२ मार्च, २०१७ अन्वये रद्द करण्यात आले आहेत. सद्य:स्थितीत, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन), २०१२ अंतर्गत विहित निकष पूर्ण करणाऱ्या खाजगी संस्था तसेच स्थानिक स्वराज्य संस्था यांना मराठी व इतर माध्यमाच्या शाळा सुरू करण्यास मान्यता देण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे-नाशिक महामार्गावरील बंद असलेला मोशी टोलनाका पुन्हा सुरु झाल्याबाबत

**(११) * १७५०१ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-नाशिक महामार्गावरील बंद केलेला मोशी टोलनाका दिनांक ५ जानेवारी,२०२३ पासून सुरु झाला असून, या टोलनाक्यावरून ये-जा करण्यासाठी स्थानिक नागरिकांना ३१५ रुपयांचा मासिक पास तर या मार्गावरुन जाणाऱ्या नागरिकांच्या हलक्या व जड वाहनांना १५ रुपयांपासून १५५ रुपये द्यावे लागणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू टोलनाका पुन्हा सुरु झाल्याने वाहन चालकांना नाहक आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) अंशत: खरे आहे.

सदर बंद झालेला मोशी टोल नाका दिनांक ५ जानेवारी, २०२३ पासून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून सुरु करण्याचे योजिले होते. परंतु स्थानिक नागरिकांच्या विरोधामुळे टोलनाका सुरु होऊ शकला नाही.

(२) हे खरे नाही.

कारण केंद्र शासनाच्या २००८ च्या पथकर आकारणीच्या नियमानुसार पूर्ण झालेल्या रस्त्याची देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी ४० टक्के टोल आकारणी करणे गरजेचे असते. सदर नियमांच्या अनुषंगाने पथकर आकारणी सुरु करणेचे योजिले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जव्हार (ता.जव्हार, जि.पालघर) येथील न्यायालयाच्या इमारतीचे बांधकाम अनेक वर्षांपासून अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१२) * १७८५६ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (ता.जव्हार, जि.पालघर) शहरात संस्थान काळातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील शंभर वर्षापूर्वीची इमारत न्यायालयासाठी देण्यात आलेली असून, सदर इमारतीची दुरवस्था झाली असूनही त्या इमारतीमध्ये न्यायालयाचे कामकाज सुरू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारत जीर्ण व धोकादायक असल्यामुळे कोणत्याही क्षणी कोसळून मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सन २०१४ साली ३ कोटी रूपये मंजूर करून सदर इमारतीचा ठेका विशाल कन्स्ट्रक्शन, नाशिक यांना देण्यात आला असूनही गत ८ वर्षांपासून सदरहू इमारतीच्या उभारणीचे काम अपूर्णावस्थेत व बंद पडल्याने सदर इमारतीची भग्नावस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने न्यायालयाच्या इमारतीच्या उभारणीचे बांधकाम प्रदीर्घ काळापासून अपूर्णावस्थेत असण्याची कारणे काय आहेत, तसेच न्यायालयाच्या सदर इमारतीच्या उभारणीचे काम विनाविलंब हाती घेऊन पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे आहे.

जव्हार शहरातील संस्थान काळातील सुमारे १०० वर्षापूर्वीच्या इमारतीमध्ये सद्य:स्थितीत कार्यालयीन कामकाज सुरु आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे अंशत: खरे आहे.
(४) व (५) जव्हार येथे नवीन न्यायालयीन इमारत बांधकामासाठी रुपये ३२७.४१ लक्ष रकमेच्या कामास दिनांक १२ फेब्रुवारी, २०१४ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. सदर कामापैकी सद्य:स्थितीत इमारतीचे आर.सी.सी. काम पूर्ण करण्यात आले आहे. जागेच्या भौगोलीक परिस्थितीमुळे इमारत कामाचा वाव वाढल्याने रुपये ९२१.१० लक्ष रकमेच्या इमारतीच्या सुधारीत अंदाजपत्रकास दिनांक १९ सप्टेंबर, २०२२ रोजी मान्यता मिळाली आहे. त्यास अनुसरुन निविदा निश्चिती करुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## पंतप्रधान गरीब कल्याण योजना (पीएमजीकेवाय) सुरु करण्याबाबत

**(१३)** * **१७९३४ श्री.अनिकेत तटकरे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने पंतप्रधान गरीब कल्याण योजनेंतर्गत (पीएमजीकेवाय) सुरु केलल्या योजनेची मुदत दिनांक ३१ डिसेंबर,२०२२ पर्यंत असल्याने सदरची योजना बंद करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेच्या काळात कोरोना महामारीचे संकट सलग दोन वर्षे राहिल्याने लाखो नागरीक बेकार झाले असून त्यांच्यावर आर्थिक संकट ओढवले असून हजारो कुटुंबांपुढे दैनंदिन गरजा, शैक्षणिक शुल्क इत्यादी समस्या निर्माण झाल्या असल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजना बंद केल्यानंतर केंद्र शासनाने नियमित धान्य योजना म्हणजेच राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत दरमहा २ रुपये किलो गहू आणि ३ रुपये किलो तांदूळ अशा वस्तु मोफत देण्यात येणार असून तसेच स्वस्त धान्य दुकानदारांना देण्यात येणारे कमिशनबाबत कोणताही उल्लेख नसल्याचेही त्याच

दरम्यान निदर्शनास आले असून पूर्वीचीच मोफत धान्य योजना सुरु करावी, अशी नागरिकांनी वारंवार मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने पूर्वीचीच मोफत धान्य योजना सुरु करावी या नागरीकांच्या मागणीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) केंद्र शासनाकडून प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेंतर्गत माहे जानेवारी, २०२३ पासून मोफत अन्नधान्याचे नियतन प्राप्त झालेले नाही.
(२) अशी बाब निदर्शनास आल्याबाबत कोणताही अहवाल या विभागास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(३) व (४) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत लाभार्थ्यांना अनुज्ञेय अन्नधान्य दिनांक १ जानेवारी, २०२३ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०२३ या कालावधीत मोफत वितरीत करण्यात येणार आहे. सदर वितरणासाठी रास्तभाव दुकानदारांना प्रचलित दराने कमिशन अनुज्ञेय राहणार आहे. राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत अन्नधान्याच्या मोफत वितरणासंदर्भात केंद्र शासनाच्या प्रतिनिधींसोबत दिनांक २९/१२/२०२२ रोजी झालेल्या बैठकीदरम्यान रास्तभाव दुकानदारांचे कमिशन अदा करण्याच्या कार्यपध्दतीबाबत स्वतंत्र सूचना देण्यात येतील असे कळविण्यात आले असून त्यानुषंगाने सर्व क्षेत्रिय कार्यालयांना अवगत करण्यात आले आहे.

प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेंतर्गत मोफत अन्नधान्य वितरणाची योजना सुरु ठेवण्याबाबत मागणी करणारे कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही. सदर योजना सुरु ठेवण्याची बाब केंद्र शासन स्तरावरील आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यात हायब्रीड ॲन्युईटीच्या कामांमध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(१४) * १८०७३ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: यवतमाळ जिल्ह्यामध्ये हायब्रीड ॲन्युईटीच्या ५८२ कोटींच्या कामांमध्ये अनियमितता झाल्याची बाब दिनांक ६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामासाठी जसराज इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. व ईगल इन्फ्रा कंपनींची नियुक्ती करण्यात आली असून यवतमाळ जिल्ह्यातील बायपास रोड सेक्शन, कळंब चौफली, पिंपळगाव, लोहारा, बाभूळगाव, कळंब, राळेगाव, शेंबाळपिंपरी, पुसद, गुंज, धनोडा, माहूर रोड ते औंढा नागनाथला जोडणारा रस्ता इ.भागात केलेल्या रस्त्यांच्या कामांमध्ये अनियमितता होवून रस्त्यांची दुरवस्था झाली असून कोळंबी (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) येथील रस्त्याच्या दुरवस्थेबाबत स्थानिक नागरिकांद्वारे स्थानिक पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा नोंद करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यवतमाळ जिल्ह्यामधील हायब्रीड ॲन्युईटी अंतर्गत करण्यात येणारी रस्त्यांची कामे पूर्ण करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जसराज इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. व ईगल इन्फ्रा कंपनींमार्फत हायब्रीड ॲन्युईटी अंतर्गत रस्त्याच्या कामांमध्ये केलेल्या अनयिमिततेबाबत संबंधित दोषी कंपन्यांवर व संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) यवतमाळ जिल्ह्यामधील हायब्रीड ॲन्युईटी योजनेंतर्गत एएम ८९-अ व ८९-ब ही दोन कामे जून, २०२१ मध्ये पूर्ण करण्यात आली असून रस्ता सुस्थितीत आहे.
तसेच हायब्रीड ॲन्युईटी योजनेंतर्गत एएम १ पॅकेज अंतर्गतचे काम प्रगतीत असून मार्च, २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कर्जत व जामखेड (जि.अहमदनगर) तालुक्यांतील कर्जत-कोरेगाव-चापडगाव-चोंडी-हलगाव येथील रस्त्याच्या कामाकरीता काढलेल्या निविदा प्रक्रियेत भ्रष्टाचार झाल्याबाबत

**(१५) * १८१४२ प्रा.राम शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १५७५२ ला दिनांक २३ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्जत व जामखेड (जि.अहमदनगर) तालुक्यातील कर्जत-कोरेगाव-चापडगाव-चोंडी-हलगाव येथील माहे मार्च, २०२० ते माहे मार्च, २०२२ या दोन वर्षात सार्वजनिक बांधकाम विभाग (राज्य) अंतर्गत रस्त्याच्या कामांतील निविदा क्षमता नसलेल्या निविदाधारकांना दिल्यामुळे निविदा प्रक्रियेत झालेल्या भ्रष्टाचाराबाबत मुख्य अभियंता यांच्यामार्फत सखोल चौकशी करून दोषदायित्व अंतर्गत निकृष्ट कामे पूर्ण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक १२ सप्टेंबर,२०२२ रोजी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अहवालातील निष्कर्षानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

(३) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे. अहवालातील निष्कर्षानुसार पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## स्वित्झर्लंडमधील दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्राकरीता कोट्यावधी रुपयांच्या गुंतवणूकीचे सामंजस्य करार करण्यात आल्याबाबत

**(१६) * १८१६१ ॲड.अनिल परब, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) स्वित्झर्लंडमधील दावोस येथे भरलेल्या जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्राकरीता राज्य शासनाने विविध उद्योगांशी संबंधित १.३७ लाख कोटी रुपयांच्या गुंतवणूकीचे सामंजस्य करार केल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सामंजस्य कराराचे थोडक्यात स्वरुप काय आहे तसेच कोणकोणत्या क्षेत्रातील कंपन्यांशी किती रुपयांचे करार करण्यात आले असून सदर कंपन्यांची नावे काय आहेत तसेच त्या कंपन्यांना राज्यातील कोणत्या जिल्ह्यात उद्योगाकरीता जागा देण्याचे निश्चित केले आहे,
(३) असल्यास, भद्रावती (जि.चंद्रपूर) येथील एमआयडीसी येथे कोल गॅसिफिकेशन प्रकल्प उभारण्यासाठी न्यू इरा क्लिनटेक सोल्युशन कंपनीसोबत दिनांक २० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास सामंजस्य करार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर कंपनी कोणत्या देशातील आहे आणि या प्रकल्पातून किती लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे तसेच सदर प्रकल्प उभारण्यासाठी किती कोटी रुपये भांडवल लागणार असून सदर प्रकल्प किती कालावधीत उभारण्यात येणार आहे ?

**श्री.उदय सामंत :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सामंजस्य करार झालेल्या प्रकल्पांचे नाव, ठिकाण व गुंतवणुकीचे क्षेत्र या अनुषंगाने सामंजस्य करारांची यादी सोबत जोडली आहे.

| अ.क्र. | कंपनीचे नाव | जिल्हा | उत्पादन क्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | मे. न्यु इरा क्लीनटेक सोल्युशन प्रा. लि. | चंद्रपूर | हाय टेक ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर इंडस्ट्रीज |
| २ | मे. इलाइट प्लास्ट ऑटोसिस्टीम प्रा.लि. | पुणे | हाय टेक ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर इंडस्ट्रीज |
| ३ | मे. निप्रो फार्मा पॅकेजिंग इंडिया प्रा.लि. | पुणे | हाय टेक ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर इंडस्ट्रीज |
| ४ | मे. बर्कशायर हॅथवे होम सर्विस ओरेंडा इंडिया | रायगड | हाय टेक ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर इंडस्ट्रीज |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | मे. आयसीपी इनवेस्टमेंट /इंडस् कॅपिटल | रायगड | हाय टेक ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर इंडस्ट्रीज |
| ६ | मे. ओवेन्स कॉर्निंग इंडिया प्रा. लि. | रायगड | हाय टेक ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर इंडस्ट्रीज |
| ७ | मे. महिंद्रा इलेक्ट्रीक व्हेइकल ऑटोमोबाईल लि. | पुणे | ऊर्जा क्षेत्र |
| ८ | मे. हंस इन्फ्रासोल्युशन्स प्रा. लि. /वुडविन एनर्जी | उस्मानाबाद, बीड, लातूर | ऊर्जा क्षेत्र |
| ९ | मे. ग्रीनको एनर्जी प्रोजेक्ट प्रा. लि. | औरंगाबाद | ऊर्जा क्षेत्र |
| १० | मे. ट्रीटोन इलेक्ट्रीक व्हेइकल एलएलसी | रत्नागिरी | ऊर्जा क्षेत्र |
| ११ | गोगोरो इंडिया प्रा. लि. /बडवे इंजिनीअरींग | महाराष्ट्र (अनेक ठिकाणी) | ऊर्जा क्षेत्र |
| १२ | मे. लक्सेमबर्ग इनवेस्टमेंट कंपनी | पुणे | आयटी/फिनटेक/डेटा सेंटर |
| १३ | मे. निपॉन टेलीग्राफ ॲण्ड टेलीफोन (एनटीटी) | मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर | आयटी/फिनटेक/डेटा सेंटर |
| १४ | मे. राजुरी स्टील ॲण्ड अलॉयज प्रा. लि. | चंद्रपूर | स्टील क्षेत्र |
| १५ | मे. वरद फेलो अलॉयज प्रा.लि. | गडचिरोली | स्टील क्षेत्र |
| १६ | मे.सम्हवन स्टील कंपनी लि. | रायगड | स्टील क्षेत्र |
| १७ | मे. रुखी फुडस | पुणे | अन्न व अन्न प्रक्रीया उद्योग |
| १८ | मे. निक्कारी कॉर्पोरेशन | अहमदनगर | अन्न व अन्न प्रक्रीया उद्योग |
| १९ | मे. वाबिओ | महाराष्ट्र (अनेक ठिकाणी) | ऊर्जा क्षेत्र (बायोगॅस) |

(३) होय, हे खरे आहे.

भद्रावती (जि.चंद्रपूर) येथील एमआयडीसी येथे कोल गॅसिफिकेशन प्रकल्प उभारण्यासाठी न्यू इरा क्लिनटेक सोल्युशन कंपनीसोबत दिनांक १७/०१/२०२३ रोजी सामंजस्य करार करण्यात आला आहे.

(४) मे. न्यू इरा क्लिनटेक सोल्युशन कंपनी सोबत आता सामंजस्य करार करण्यात आलेला आहे. त्यामध्ये सदर कंपनीने रुपये २०,००० कोटीच्या गुंतवणुकीचा प्रस्ताव दिलेला आहे.तथापि, उद्योग उभारणी, रोजगार व प्रत्यक्ष गुंतवणुकीसंदर्भातील सविस्तर तपशिल निश्चित झाल्यानंतर शासनस्तरावर देण्यात येणाऱ्या देकारपत्रामध्ये नमूद करण्यात येईल.

-----------------

## राज्यातील मुलींना देण्यात येणाऱ्या दैनिक उपस्थिती भत्त्यात वाढ करण्याबाबत

**(१७) * १६९९७ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.निलय नाईक : दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ६ मधील प्रश्न क्रमांक १४४९० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या धोरणानुसार दारिद्रयरेषेखालील तसेच आदिवासी क्षेत्राबाहेरील अनुसूचित जाती - जमाती, भटक्या जमाती मधील इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या मुलींची पटसंख्या वाढविण्यासाठी तसेच मुली शिकाव्यात व त्यांच्या शिक्षणाला मदत व्हावी यासाठी दिनांक २ जानेवारी, १९९२ पासून शासनाकडून प्रतिविद्यार्थींनी १ रुपये देण्यांत येत असलेल्या प्रोत्साहन उपस्थिती भत्त्यात गत ३१ वर्षात वाढ झाली नसल्याची बाब दिनांक ५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महागाई दर वाढल्याने आणि शैक्षणिक साहित्याच्या रकमेत कित्येक पटीने वाढ झाली तरी देखील उपस्थित भत्ता एक रुपयावर स्थिर असल्याने मुलींच्या शिक्षणाची परवड होत आहे, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने मुलींना देण्यात येत असलेल्या दैनिक उपस्थिती भत्त्यात वाढ करण्याबाबत शासनाने कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) उपस्थिती भत्ता या योजनेनंतर म्हणजे १९९२ नंतर मुलींची उपस्थिती वाढविण्यासाठी केंद्र / राज्य पुरस्कृत विविध नवीन योजना उदा. मध्यान्ह भोजन योजना, मोफत पाठयपुस्तके योजना, मोफत गणवेष योजना, विविध शिष्यवृत्त्या, वाहतूक भत्ता, मुलींसाठी वस्तीगृह व आश्रम शाळा, कस्तुरबा गांधी विद्यालय, शौचालय / स्वच्छतागृहे अशा अधिक प्रभावी नवीन योजना सुरू करण्यात आल्या. तसेच मानव विकास मिशन मार्फत मुलींना मोफत सायकल वाटप योजना व मोफत ST प्रवास योजना राबविण्यात येते. मुलींना १२ वी पर्यंत मोफत शिक्षण योजनाही राबविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## म्हाप्रळ -आंबेत (जि.रायगड) या दरम्यानच्या खाडीवरील पूल बांधण्याबाबत

**(१८) * १७५४७ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाप्रळ-आंबेत (जि.रायगड) या दरम्यानच्या खाडीवरील पुलावरून दापोली व मंडणगड तालुक्यांसह ग्रामीण भागातील प्रवाशांची ये-जा सुरू असते, सदर जुन्या पुलाची दुरुस्ती न झाल्यामुळे ग्रामस्थांना व विद्यार्थ्यांना ये- जा करण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभाग, कार्यकारी अभियंता, महाड यांनी ग्रामस्थांच्या मागणीवरून म्हाप्रळ-आंबेत दरम्यानच्या खाडीवर पूल बांधण्यासाठी राज्य सरकारकडे प्रस्ताव सादर केला असून, सदर खाडीवर नवीन पूल बांधण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ०६/१२/२०२२ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रायगड जिल्ह्यातील म्हाप्रळ-आंबेत दरम्यानच्या खाडीवर पूल बांधण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.

अस्तित्वातील पुलाचे दोन गाळे क्षतिग्रस्त झाल्याने सदर पुलावरुन वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात आली आहे. प्रवासी वाहतुकीसाठी दिनांक १२/०३/२०२२ पासून फेरीबोटीची सेवा निशुल्क उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) अस्तित्वातील पुलाच्या नादुरुस्त झालेल्या पाया, स्लॅब व अनुषंगिक बाबींच्या दुरुस्तीचे काम सद्य:स्थितीत प्रगतीत आहे.

सदर ठिकाणी नवीन पूल बांधण्याचे काम निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन राहील.

-----------------

## जॉन्सन ॲण्ड जॉन्सन कंपनीच्या मुलुंड (मुंबई) येथील कारखान्यात बेबी पावडरचे निकृष्ट दर्जाचे उत्पादन होत असल्याबाबत

**(१९) * १७२२२ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जॉन्सन ॲण्ड जॉन्सन कंपनीच्या मुलुंड, मुंबई येथील कारखान्यात बेबी पावडरचे निकृष्ट दर्जाचे उत्पादन होत असून पावडर मध्ये पीएच आढळल्याचा अहवाल केंद्रीय औषध प्रयोगशाळा, कलकत्ता यांनी दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने बाळाच्या आरोग्याचा प्रश्न असल्याने उक्त कंपनी ४८ तासाच्या आत बंद करण्याचे आदेश दिनांक २० सप्टेंबर, २०२२ रोजी अन्न व औषध प्रशासन विभागाला दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई उच्च न्यायालयाने सदर कंपनीचा परवाना दिनांक २० सप्टेंबर, २०२२ रोजी रद्द करण्याचे आदेश दिले असतानाही दोन वर्ष होऊनही उत्पादन सुरु असल्याबाबत दिनांक ३ जानेवारी २०२३ रोजी अन्न व औषधी प्रशासनावर ताशेरे ओढले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) हे अंशत: खरे आहे.
सौंदर्य प्रसाधन चाचणीकरीता BIS मानकानुसार चाचणी केली जाते. मानकानुसार Baby Talcum Powder करीता pH मर्यादा ५.५ to ८ ही आहे. Johnsons Baby Powder, B. No.B३R८०८०४ या समूह क्रमांकाचा पाठ पुनर्तपासणी करीता केंद्रीय प्रयोगशाळा कलकत्ता येथे पाठविला असता त्यांचे pH हे ८.४२ इतके असल्याचे त्यांच्या विश्लेषण अहवालात नमूद केले आहे. सदर pH हे BIS मानकांपेक्षा जास्त असल्याने सदरचा नमुना अप्रमाणित घोषित केला आहे.
(२) व (३) खरे नाही.
(४) याप्रकरणी चौकशी करण्यात आली असून Johnson & Johnson baby powder या उत्पादनात आढळलेले दोष व उत्पादन पाठाचा वापर याबाबी विचारात घेऊन व्यापक जनहितार्थ सदरील पाठाचे उत्पादन त्वरील थांबविण्याबाबत अन्न व औषध प्रशासन विभागाने दिनांक २०/०९/२०२२ च्या पत्रान्वये संस्थेस आदेश दिले होते. सदरहू आदेशाविरुध्द संस्थेने शासनाकडे अपील अर्ज सादर केला होता.सदरहू अपील अर्ज शासनाने दिनांक ०९/१०/२०२२ रोजी नामंजूर केला. शासनाच्या सदर निर्णयाविरुध्द संस्थेने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र.WPL/३२००४/२०२२ दाखल केली होती. मा.उच्च न्यायालयाने त्यांच्या दिनांक १२/०१/२०२३ च्या आदेशान्वये अन्न व औषध प्रशासनाचे दिनांक १५/०९/२०२२ चे आदेश रद्द करून बेबीपावडरचे उत्पादन व विक्री करण्यास पूर्ववत परवानगी दिली आहे. याबाबत सरकारी अभियोक्ता यांचे अभिप्राय घेण्याची कार्यवाही चालू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खडका किन्ही (ता.भुसावळ, जि.जळगाव) येथे केळीच्या टाकाऊ भागापासून विविध पदार्थ निर्माण करणाऱ्या प्रकल्पाच्या उभारणीबाबत

**(२०) * १७६५८ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खडका किन्ही (ता.भुसावळ, जि.जळगाव) येथे केळीच्या टाकाऊ भागापासून विविध पदार्थ निर्माण करणाऱ्या जेनेटेक बायो प्रॉडक्ट हा उद्योगसमूह प्रकल्प उभारणी करणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जेनेटेक बायो प्रॉडक्ट या उद्योगसमूहास शासनाकडून विविध प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू प्रकल्प उभारणीबाबत तसेच प्रोत्साहन अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) होय, हे खरे आहे.

तथापि, सदर उद्योग घटकाचे नाव हे जेनेटेक बायो प्रॉडक्ट नसून, मे.जेनक्रेस्ट बायो प्रोडक्टस प्रा.लि. असे आहे.
(२) होय हे खरे आहे.
(३) सदर उद्योग घटकाने प्रकल्प उभारणीकरीता केलेल्या विविध मागण्यांच्या प्रस्तावास मा.मुख्यमंत्री महोदयांचे अध्यक्षतेखालील मा.मंत्रिमंडळ उपसमितीच्या मान्यतेने विविध प्रोत्साहनपर अनुदाने मंजूर करण्यात आलेली आहेत. त्यानुसार सदर मे.जेनक्रेस्ट बायो प्रोडक्स प्रा.लि. या घटकास दिनांक १४ डिसेंबर, २०२२ रोजी देकार पत्र देण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## केंद्र सरकारच्या राष्ट्रीय उच्च शिक्षा अभियानाअंतर्गत निवड झालेल्या मुंबई विद्यापीठ व निर्मला निकेतन या संस्थांनी रिक्त पदांबाबतची माहिती न दिल्याबाबत

**(२१) * १८०३० श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र सरकारच्या राष्ट्रीय उच्च शिक्षा अभियानाबाबत राज्य शासनाने दिरंगाई करून `राज्य उच्च व तंत्र शिक्षण परिषद' स्थापन करण्यास ३ वर्षचा विलंब झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील उच्च शिक्षणावर स्थूल राज्य उत्पन्नाच्या २ टक्के खर्च करावा अशी अट असताना केवळ ०.३२ टक्के इतकाच खर्च केल्याचे भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या दिनांक ३१ मार्च, २०२१ रोजीच्या अनुपालन अहवालातून अनेक बाबी निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उच्चस्तर शिक्षा अभियानासाठी निवडलेल्या २४ संस्थांवर शासनाचे संनियंत्रण नसल्याने तसेच या संस्थांमधून शिक्षक कर्मचाऱ्यांची ४० टक्क्यांपेक्षा जास्त पदे रिक्त असून मुंबई विद्यापीठ व निर्मला निकेतन या सारख्या संस्थांनी आपल्याकडील शिक्षक कर्मचाऱ्यांच्या पदांबाबत भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना माहिती दिली नाही तसेच शासनाने उचित स्पष्टीकरण दिलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठ व निर्मला निकेतन या सारख्या संस्थांनी रिक्त पदांबाबत माहिती न देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) नाही. हे खरे नाही.

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ नुसार राज्यात विधिवत राज्य उच्च शिक्षण परिषद अस्तित्वात होती. तथापि, शासनाने २०१६ मध्ये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा लागू केला असून त्यातील तरतूदीनुसार "राज्य उच्च शिक्षण आणि विकास आयोग" आणि "रुसा परिषद" या दोन संस्था गठीत करण्यात आल्या आहेत.

(२), (३) व (४) हे अंशतः खरे आहे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या दिनांक ३१ मार्च, २०२१ रोजीच्या अनुपालन अहवालातील निरिक्षणांनुसार उच्च शिक्षणांवर केवळ उच्च शिक्षणांअंतर्गत केलेला खर्च नमूद केला असून उच्च शिक्षण विभागाच्या कक्षेत खाजगी स्वरुपाच्या अनेक उच्च शिक्षण संस्था व महाविद्यालयेही येतात त्याद्वारे उच्च शिक्षणावर होणारा खर्च, समाजकल्याण विभाग, आदिवासी विभाग, अल्पसंख्याक विभाग, क्रीडा विभाग यांच्याकडून उच्चशिक्षणासाठी होणारा खर्च याशिवाय कृषी शिक्षण, वैद्यकीय शिक्षण आणि तंत्र शिक्षण हे ही उच्च शिक्षणाशी संबंधित असून त्यासाठी होणारा खर्च त्यात समाविष्ट केलेला नाही. ही बाब, तसेच, विभागाच्या अखत्यारीतील रिक्त पदांसंदर्भातील निरिक्षणाच्या अनुषंगाने योग्य प्रक्रियेचा अवलंब करुन रिक्त पदे भरण्याबाबतची प्रक्रिया सुरु करण्यात आली असल्याची बाब भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांद्वारे सादर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील शिक्षकेतर कर्मचारी यांची विनाअनुदानित पदावरून अनुदानित पदावर बदली करणेबाबत

**(२२) * १७५४८ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात हजारो शिक्षक विनाअनुदानित तत्वावर अनेक वर्षांपासून कार्यरत असून, शासनाच्या धोरणानुसार शिक्षकांची एकाच संस्थेच्या अनुदानित विभागात रिक्त जागी बदली करण्याचे धोरण निश्चित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी व्यवस्थापानाच्या शाळेतील विनाअनुदानित जागेवरून अनुदानित जागेवर शिक्षकांची बदली करणेबाबत शासनाने दिनांक २८ जून २०१५ रोजी शासन आदेश निर्गमित केला असून राज्य सरकारच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दिनांक १ डिसेंबर २०२२ रोजी परिपत्रक काढून विनाअनुदानित ते अनुदानित शाळा किंवा तुकडीवर बदली करण्यास तुर्त स्थगिती दिली आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १ डिसेंबर २०२२ चे शासन परिपत्रक रद्द करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (कोकण पदवीधर) यांनी दिनांक ०५/१२/२०२२ रोजी मा.शालेयिशिक्षण मंत्री यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे,

(४) असल्यास, सदर शासन आदेशानुसार फक्त शिक्षकांचीच संस्थेत रिक्त असलेल्या जागेवर बदली करता येत असल्याने दिनांक २८ जून, २०१५ रोजीचा शासन आदेश शिक्षकेतर कर्मचारी यांना लागू करणेबाबत मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दिनांक २८ जून, २०१५ रोजीचा शासन आदेश शिक्षकेतर कर्मचारी यांना लागू करणेबाबत तसेच दिनांक १ डिसेंबर २०२२चे शासन परिपत्रक रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) शासन निर्णय दिनांक २८ जून, २०१६ अन्वये विनाअनुदानित पदावरुन अनुदानित पदावर बदली करणेबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. तद्नंतर दिनांक ०८/०६/२०२० रोजीच्या अधिसूचनेच्या अनुषंगाने दिनांक ०१/०४/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत व या शासन निर्णयान्वये दिनांक २८ जून, २०१६ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात आला आहे.

शासन परिपत्रक दिनांक ०१ डिसेंबर, २०२२ अन्वये शासन अधिसूचना दिनांक ०८ जून, २०२० मधील बदलीच्या तरतूदीस तूर्त स्थगिती देण्यात आली आहे.
(३) हे खरे आहे.
(४) व (५) शासन निर्णय दिनांक २८/०६/२०१६ अधिक्रमित करण्यात आला आहे. शासनपत्र दिनांक ०१ डिसेंबर, २०२२ अन्वये दिनांक ०८ जून, २०२० रोजीच्या अधिसूचनेतील तरतूदीस स्थगिती देण्यात आली असून, सदर परिपत्रकान्वये आयुक्त (शिक्षण) यांना अहवाल सादर करणेबाबत सूचित करण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: मुंबईतील मराठी माध्यमाच्या अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्याबाबत

**(२३) * १७२२६ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात प्राथमिक शाळांमधील विद्यार्थी संख्या मोठ्या प्रमाणात घटणार असल्याचे राष्ट्रीय शैक्षणिक व प्रशिक्षण परिषद यांनी जाहीर केलेल्या अहवालानुसार माहे ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विशेषत: मुंबईत मराठी शाळा बंद होत असल्याने ३०० पेक्षा जास्तिशक्षक अतिरिक्त तसेच मुंबईतील खासगी अनुदानित शाळांतील ३०० हून अधिक मराठी माध्यमातील शिक्षक अतिरिक्त झाले असून मराठी माध्यमाच्या अतिरिक्त शिक्षकांची संख्या इतर माध्यमांपेक्षा अधिक असल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन झाल्याशिवाय खासगी किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये नवीन शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती करण्यात येऊ नये असा शासन निर्णय आहे मात्र शासनाचे नियम डावलून सन २०१२ ते २०१५ च्या कालावधीत शिक्षणाधिकाऱ्यांनी शिक्षकांना वैयक्तीक मान्यता देण्यात आल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०२३ च्या सुमारास शासनाच्या निदर्शनास आला असून परभणी जिल्ह्यात अनेक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैयक्तीक मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्याबाबत व बंद पडणाऱ्या मराठी शाळा वाचविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) परभणी जिल्ह्यामध्ये सन २०१२ ते २०१५ या कालावधीमध्ये शासनाचे नियम डावलून वैयक्तीक मान्यता देण्यात आलेल्या नाहीत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.